मुलांसाठी बाइबल
प्रस्तुत

नदीतून मिळालेला राजकुमार

लेखक: Edward Hughes
रेखाचित्रकार: M. Maillot; Lazarus
रूपान्तरकार: M. Maillot; Sarah S; Alastair Paterson
अनुवादक: Rev. Shilas Gavit
निर्माता: Bible for Children
www.M1914.org

BFC
PO Box 3
Winnipeg, MB R3C 2G1
Canada

©2022 Bible for Children, Inc.
परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्ट विकत नाहीत,
तोपर्यंत तुम्ही तीं कॉपी किंवा मुद्रित करू शकता.

पंतप्रधान योसेफ मरण पावला! सर्व
मिसर देश त्याच्या दुःखात सामिल झाले.
दुष्काळातून देशाला वाचविण्यासाठी
देवाने योसेफ या इब्री मनुष्याचा
उपयोग केला होता.

तो हुशार आणि
आवडता पुढारी
होता. आता
तो राहिला
नव्हता.

या घटनेनंतर, ३०० वर्षांपेक्षा जास्त कालावधि होऊन गेला. योसेफाचे लोक; इब्री लोक, यांची मिसरात मोठ्या प्रमाणात वाढ झाली. हे लोक माझ्या विरुध्द्दात जातील अशी नवीन फारोला या लोकांविषयी भित वाटली, म्हणून त्याने त्या सर्वांना गुलाम बनविले.



फारोने इब्री लोकांना क्रूरतेची वागणूक दिली. मोठ–मोठी शहरे बांधण्यास त्याने त्यांच्यावर बळजबरी केली. फारोने त्यांना कितीही जड काम दिले तरी इब्री गुलामांची संख्या वाढतच होती.



फारोकडून एकेदिवशी एक भयंकर थरकांप करणारा आदेश आला. "इब्री लोकांत जितके मुलगे जन्मास येतील त्या सर्वांना निल नदीत फेकून द्यावे." याप्रकारे इब्री लोकांची संख्या कमी करावी अशी या दुष्ट फारोची योजना होती. तो अगदी बाळांची देखिल हत्या करण्यास तयार होता!



"आता आम्ही काय करावे?" एक कुटुंब याप्रकारे घोटाळ्यात पडले असावे. त्यांच्या मुलाला निल नदीत सोडण्याचे त्यांनी ठरविले. परंतु तो एका अशा टोपलीत असणार, ज्या टोपलीत पाणी शिरणार नाही.

अतिशय मौल्यवान सामानासह ती टोपली नदीतील लव्हाळ्यात तरंगू लागली. या छोट्याशा बाळाचे आता काय होईल?



ती मौल्यवान टोपली त्या नदीच्या लव्हाळ्यात हळूवारपणे वाहात जात असतांना,
त्या मुलाची बहीण दुर अंतरावरुन त्या टोपलीवर लक्ष ठेवून होती.

अचानक फारोची मुलगी आणि तिच्या दासी नदीवर आंघोळीला आल्या. ती टोपली न पाहताच ते निघून जातील या व्यतिरिक्त ती टोपली लपविण्याचा आता दुसरा कोणताच मार्ग नव्हता.

"ओह! टोपली! तेथे, लव्हाळ्यात.
आत काय असेल याचे मला
कुतुहूल आहे." फारोच्या मुलीने
ती टोपली पाण्यातून बाहेर घेऊन
येण्याची आज्ञा केली. जेंव्हा तिने
ती उघडली, तेंव्हा त्यातील बाळ
रडू लागले. "हे इब्री बाळ आहे",
असे राजकुमारी उद्‌गारली.



"बिचारे लहान बाळ. तू फार सुंदर आहेस." कदाचित ज्या प्रकारे मोठी माणसे लहान लेकरांशी बोलतात तसे फारोची मुलगी त्या बाळाशी बोलली असावी.

कदाचित तीने, "अलेलेले सोनुल्या, कित्ती गोड!" असे म्हटले असावे.

आणि हे निश्चितच मिसरी भाषेत बोलली असेल.

त्या बाळाच्या बहिणीला देवाने विशेष ज्ञान दिले असावे. ती पळतच फारोच्या मुलीकडे गेली आणि म्हणाली, "तुमच्यासाठी या मुलाची काळजी घेण्यास मी एखाद्या इब्री बाईला शोधून आणू का?" "जा शोधून आण" असे प्रत्युत्तर तिला मिळाले. पळतच ती मुलगी कोणाला घेण्यास गेली असावी असे तुम्हांला वाटते?

"आई! लवकर चल! अग, लवकर ना!" स्पष्टीकरण देण्यास त्या मुलीकडे कदाचित वेळच नसावा. पटकन त्या दोघीही परत त्या वाटेने गेल्या.

त्या नदीवर परतल्या, तेथे फारोची मुलगी त्या बाळाला घेऊन उभी होती. "माझ्यासाठी या बाळाची काळजी घे. मी त्यासाठी तुला पगार देईन. त्याला मोशे नावाने हाक मार." मिसरी लोकांसाठी मोशे म्हणजे पाण्यातील पुत्र असा अर्थ होत असावा.

याप्रकारे मोशे त्याच्या आईवडीलांकडे व त्याच्या घरि परतला. देवावर आणि इब्री लोकांवर प्रीति करण्याचे त्यांनी त्याला शिकविले. लवकरच तो फारोच्या मुलीसंगती फारोच्या राजवाड्यात राहायला गेला. ज्या देवाने त्याचा जिव वाचवला होता त्या परमेश्वराकडे या मोशे बाळासाठी महान भविष्य होते.



नदीतून मिळालेला राजकुमार

परमेश्वराची वाणी - बाइबल मधून गोष्ट

घेण्यात आली आहे

निर्गम २

"तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो."
स्तोत्रसंहिता ११९:१३०


समाप्त

बाइबलमधील ही गोष्ट आम्हांला आमच्या सुंदर परमेश्वराविषयी सांगते ज्याने आम्हांला बनविले आणि ज्याची अशी इच्छा आहे की आम्ही त्याला ओळखावे.

परमेश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मरण आहे, पण परमेश्वर तुमच्यावर इतके प्रेम करतो की त्याला तुमच्या पापांची शिक्षा मिळावी आणि वधस्तंभावर मरावे म्हणून त्याच्या एकुलता एक पुत्र येशू याला पाठविले. नंतर येशू जिवंत झाला आणि स्वर्गातील घरी गेला. जर तुम्ही येशूमध्ये विश्वास ठेवता आणि तुमच्या पापांसाठी त्याने क्षमा करावी अशी त्याला विनंती करता, तर तो नक्की क्षमा करील. तो आता तुमच्याबरोबर येऊन राहील आणि तुम्ही त्याच्याबरोबर कायम राहणार.

हे सत्य आहे यावर जर तुम्ही विश्वास ठेवता, तर परमेश्वराला हे सांगाः
प्रिय येशू, तू परमेश्वर आहेस आणि माझ्या पापांसाठी मरण पावण्यास मनुष्य बनला आणि आता तू जिवंत आहे यावर माझा विश्वास आहे. कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांची मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल, आणि एके दिवस मी कायम तुझ्याबरोबर राहण्यासाठी येईन. तुझी आज्ञा पाळण्यासाठी आणि तुझे मूल होऊन जगण्यासाठी मला मदत कर. आमेन.

बाइबल वाचा आणि परमेश्वराशी रोज बोला! योहान 3:16